**<u>मे. गोदावरी बायोरिफायनरिज लिमिटेड, पोस्ट-साकरवाडी, तालुका -कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७०८), या रसायन निर्मिती करणाऱ्या कारखान्याचे ६,७१५.० मे. टन प्रति महिना ते २०,०९०.९४ मे.टन प्रति महिना पर्यंत प्रस्तावित विस्तारीकरण करणेकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा इतिवृत्तांत</u>**

मे. गोदावरी बायोरिफायनरिज लिमिटेड ,कोपरगाव- तालुका ,साकरवाडी-पोस्ट , (७०८ ४१३) अहमदनगर - जिल्हा, या रसायन निर्मिती करणाऱ्या कारखान्याचे ६७१५.०० मे टन प्रति महिना ते २००९०.९४ मे टन प्रति महिना पर्यंत विस्तारीकरण करणेकरीता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक.१४ ऑक्टोबर२०२० , रोजी सकाळी ११. वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदर जनसुनावणीकरिता खालीलप्रमाणे समिती सदस्य उपस्थित होते.

१) अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) उप प्रादेशिकअधिकारी -अहमदनगर - **संयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर

श्री. संजीव रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले.समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

संयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित अधिसुचना दिनांक १ डिसेंबर, २००९ अन्वये प्रदुषणकारी विशिष्ठ

प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे आवश्यक आहे.

श्री.संजीव रेदासनी यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. गोदावरी बायोरिफायनरिज लिमिटेड, पोस्ट-साकरवाडी, तालुका -कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७०८), या कारखान्याने प्रस्तावित विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज मंडळाकडे केला होता. संयोजक यांनी सदर जनसुनावणी घेणे करिता अवलंबलेल्या प्रक्रियेची थोडक्यात माहिती दिली तसेच सदर जनसुनावणी घेणे बाबत चे महत्व विषद केले.
सदरहू पर्यावरणविषयक सुनावणी दिनांक ०७-०४-२०२० ला आयोजित करण्यात आलेली होती. मात्र कोविड विषाणुच्या प्रादुर्भावामुळे ती रद्द करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन पत्रानुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पालन, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे व सदर जनसुनावणी आज दि.१४/१०/२०२० रोजी आयोजित केलेली आहे. सदर जनसुनावणी कोविड - १९ च्या अनुषंगाने समुह पद्धतीने घेण्यात येत आहे.

संयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उपप्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर या कार्यालयाकडे ०९ सुचना / तक्रार नोंदविण्यात आलेल्या आहेत. संयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सुचना असल्यास लेखी वा तोंडी स्वरुपात करु शकतात असे सांगितले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी व संपुर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.
पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पासाठी 200.00 कोटी रुपयांची गुंतवणूक असून प्रकल्प हा संपुर्ण शुन्य विसर्ग तत्वावर असणार आहे. त्यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.

सादरीकरणानंतर संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**सुनावणी वेळी खालीलप्रमाणे आक्षेप, सुचना, टिकाटिप्पणी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत.**

१) **श्री अमोल अण्णासाहेब टेके, वारीगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

मी दिनांक १२-१०-२०२० तारखेला माझ्या लेखी सूचना म.प्र.नि.मंडळ कार्यालय, अहमदनगर यांना दिलेल्या आहेत. त्या लेखी सूचना मप्रनि मंडळाने अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर ठेवाव्यात अशी माझी विनंती राहिल. माझी विनंती आहे की -

अ) प्रकल्प प्रवर्तकांनी पाणी वापरण्यासाठी/उचलण्यासाठी पाण्याचे जे स्रोत विचारात घेतले आहेत, त्यासाठी ज्या विविध परवानग्या घेतल्या, त्यात पाटबंधारे खात्याकडून वार्षिक किती लिटर्स पाणी वापरण्याची मंजुरी /परवानगी मिळाली याचा स्पष्ट उल्लेख नाही. तरी त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

ब) जनसुनावणीपूर्वी पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल (EIA Report) व कार्यकारी सारांश अहवाल ग्रामपंचायती कार्यालयास आगाऊ उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. कार्यकारी सारांश अहवाल ग्राममपंचायत कार्यालयास मराठीत उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतानाही तो इंग्रजीत देण्यात आला. माझा यावर आक्षेप/तक्रार आहे. फक्त कार्यकारी सारांश अहवाल मराठीत दिला. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालयाने तशी लेखी माहिती मला दिलेली आहे की त्यांना पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल मराठीत मिळालेला नाही.

क) पर्यावरण विषयक जनसुनवाणी समितीस मी लक्षात आणू इच्छितो की प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघाचा अभ्यास करणे बंधनकारक आहे. १० कि.मी. परिघात २४ गांवे येतात. मात्र पर्यावरण सल्लागार यांनी फक्त विशिष्ट १० गावांचाच अभ्यास केलेला आहे. तरी परिघातील संपूर्ण २४ गावांचा अभ्यास का केला नाही याची कारणे बैठकीत द्यावी.

ड) पर्यावरणविषयक प्रभाव मुल्यांकन अहवाल तयार करताना कारखान्याकडून यासंबंधी पुर्व इतिहास तसेच संपूर्ण माहिती घेण्यात आलेली नाही. सदरहू प्रकल्पाकडून पूर्वी झालेल्या अनेक त्रुटी याबाबत म.प्र.नि. मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडून कुठलाही पत्रव्यवहार पर्यावरण सल्लागार यांनी प्रारुप पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात नोंद घेतलेली नाही. याचा खुलासा करण्यात यावा. त्यांनी अहवालात ती नोंद घेणे गरजेचे राहील.

माझ्यामते राष्ट्रीय हरित लवादाच्या अहवालामध्ये भूगर्भातील पाणी शेतालाही योग्य राहिलेले नाही असा निकाल राष्ट्रीय हरित लवादाने दिलेला आहे. त्यास काहीही उत्तर पर्यावरण प्रभाव प्रभाव मुल्यांकन अहवालात नाही.

इ) राष्ट्रीय हरित लवादाचा निकाल, त्याबाबत मप्रनि मंडळाचे पत्र घेतलेले नाही. येथील भूगर्भातील पाणी शेतालाही योग्य राहिलेले नाही असा निकाल राष्ट्रीय हरित लवादाने दिलेला आहे. त्यास काहीही उत्तर पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात नाही.

ई) चॅप्टर ४ प्रमाणे हरितपट्टा विकसनाबाबत सादरीकरणात सांगितले. या अँटीसिपिटेड रिस्क म्हणजे याचा पर्यावरणाला काय धोका होणार आहे त्यामध्ये पाणी २५%, हवा २५%, गावाचा विकास, शिक्षण सीएसआर आणि सीईआर ५०% असे सादरीकरणात सांगितले. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निस्साःरण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) आहे. मात्र आता कार्यरत प्रकल्पातील हरित पट्ट्यासाठी वापरत असलेले पाणी व प्रस्तावित प्रकल्पासाठी हरित पट्टा क्षेत्र व त्यास किती पाणी लागेल याचा खुलासा अहवालात नाही. त्याचा खुलासा करण्यात यावा, अहवालात सध्या अस्तित्वात असलेल्या १४,००० झाडांची संख्या विचारात घेतलेली आहे, तर प्रस्तावित १०,००० अशी एकूण २५,००० झाडांची संख्या प्रकल्प कार्यरत झाल्यावर, तर एकूण किती पाणी दरदिवशी लागेल, घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (एसटीपी) व औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा (ईटीपी) यातून दर दिवशी प्रक्रिया केलेले किती पाणी हरित पट्ट्यासाठी वापरता येईल व याची तुलना कोणत्या नियमाप्रमाणे केली याबाबतचा खुलासा करण्यात यावा. यात हरित पट्ट्याचे क्षेत्र, झाडांची संख्या व निर्मित होणारे सांडपाणी याचा सुतराम संबंध लक्षात येत नाही. कारण २७.० लाख लिटर्स प्रती दिवशी पाण्याचा वापर प्रकल्पात आहे. दर दिवशी सांडपाणी निर्मिती होणारच आहे. तर प्रति दिवशी किती प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणार, किती रेनवॉटरचे पाणी प्रती दिवशी घेणार व दर दिवशी किती पाणी हरित पट्ट्यास वापरणार याचा खुलासा करण्यात यावा. माझ्या अभ्यासाप्रमाणे या परिसरात

जून ते डिसेंबरपर्यंत झाडांना पाण्याची गरज पडत नाही. रेन वॉटर त्यांना पुरेशे आहे. अती पाणी दिल्याने झाडे येऊ शकत नाहीत. जून ते डिसेंबर इटीपी व एसटीपीचे प्रक्रिया केलेले सर्व पाणी साठवण करण्याची व्यवस्था याबाबत खुलासा करण्यात यावा. म्हणजे अतिरिक्त पाणी हे जमिनीवर पसरवले जाईल. या प्रकल्पाविषयी अनेक लोकांच्या तक्रारी मप्रनि मंडळाकडे प्रलंबित आहेत.

याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी तज्ञ समितीकडे कोणताही उल्लेख केलेला नाही.तसेच १९३९ पासून पर्यावरणावर या प्रकल्पामुळे काय बदल झाले, हे प्रकल्प प्रवर्तकांनी तज्ञ समितीकडे मांडणे हे त्यांचे आद्य कर्तव्य होते. ध्वनी प्रदूषणामुळे स्थनिकांमध्ये डोकेदुखीचा त्रास, चिडचिडपणाचा त्रास वाढला. प्रकल्प परिसरात शाळाही होती. लहान मुळे शाळेत शिकत होती. ती दुसरीकडे हलवली. ध्वनी प्रदुषणामुळे मुलांना शाळेत काय शिकवले जाते याचा अभ्यास केला तर गावातील रयत शिक्षण संस्थेच्या शाळेतील मुलांची मार्क मिळवण्याची वार्षिक टक्केवारी ९० टक्के पेक्षा पुढे किती आहे याचे अवलोकन करून मुलांचा बौद्धिक विकासावर परिणाम होतो कि नाही याचा निष्कर्ष काढणे जरुरीचे आहे.

ते म्हणाले की माझ्याकडे माननीय अध्यक्षांकडे सादर करण्यासाठी लेखी आक्षेप, हरकती आहेत. अहवाल हा केंद्र शासनास पाठविण्याअगोदर त्यात दुरुस्त्या करणे गरजेचे आहे, आपल्यापुढे संपूर्ण प्रकल्पाचे क्षेत्रफळ दिले गेले. या प्रकल्पात ४६२ घरे उपलब्ध करून दिली असा उल्लेख आहे. मी दाखल केलेले आहे की मिळकती वर ४६२ घरे मोजून दाखवावित. ग्रामपंचायतीकडे कर भरताना १०० साध्या घरांचे कर, ६५ बंगले, व खुली जागा याची तीन वर्षांची करपट्टी भरली १८ लाख रुपये. माझी अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की त्यांनी जी कामगारांच्या घरांची घरपट्टी भरली, त्यात ७० टक्के सुट ग्रामपंचायतीकडून दिलेली आहे. १९३९ जेव्हा साखर कारखाना आला,त्यावेळचे बांधकाम आहे. पावसाळ्यात महिलांना पावसाळ्यात पाणी गळायला लागले की पातेले ठेवावे लागते. अशी वाईट परिस्थिती काही घरांध्ये आहे. म्हणजे प्रकल्प प्रवर्तक/सल्लागार यांनी सांगितलेली घरांची संख्या खरी नाही. नाही तर त्यांनी मोजून दाखवली पाहिजे. प्रकल्प विस्तरारिकरणासाठी १९९ गट नं. घेतलेला आहे. या १९९ गट नं. मध्ये गेले साठ वर्षांपासून अनेक गरीब लोकांची वस्ती आहे. ती गोष्ट या अहवालात नमूद केलेली नाही. ग्रामपंचायतीने १९९ गट नंबर मध्ये गरीबांसाठी रस्ते, दिवे, पाणी उपलब्ध करून दिलेले आहे. माननीय

अध्यक्षांना विनंती की आपण स्वतः पहाणी करावी. महसुली अधिकारी/तलाठी येथे असतील तर त्यांच्या रेकॉर्डवर पीक पाहणी संदर्भात काय रेकॉर्ड आहे, कोणाची नावे लावलेली आहेत. याची खातरजमा करावी. ग्रामपंचायतीने किती लाख खर्च केला आहे ते विचारात घ्यावे. या गोष्टी १९९ गट नंबर मधील वगळणे गरजेचे आहे किंवा नाही या बाबत तज्ञ अभ्यास गटाने खुलासा करावा. ग्राम पंचायतीने किती खर्च केला हे विचारून घ्यावे.

पर्यावरण सल्लागार यांना १० कि,मी. परिघामध्ये पुरातत्व विभागाचे एकही मंदीर आढळले नाही. तसा अभ्यास गटाने रिमार्क मारलेला आहे. माझ्या माहितीनुसार औरंगाबाद येथे १६ व्या शतकातील कोकमठाण येथे जुने मंदीर आहे. प्रत्येक कुंभमेळ्यास १२ वर्षांनंतर अनेक साधुसंत येथे येतात. एवढा ऐतिहासीक वारसा असताना त्याचा उल्लेख पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात नाही. माझे असे म्हणणे आहे की सदरहू अहवाल हा कार्यालयात बसून केलेला आहे. प्रत्यक्ष पाहणी केलेली दिसत नाही. चांगल्या व वाईटही गोष्टी आलेल्या नाहित.

ते म्हणाले या गावाच्या हद्दीत वन विभागाची जमिन आहे. त्याचे सर्व्हे नं. १२५ व १२६ आहे. मात्र पर्यावरण सल्लागार यांनी ते विचारातच घेतलेले नाही.
त्यांनी रस्त्याची परिस्थिती सांगताना माहिती दिली की ६५ वृत्तपत्रात बातमी आलेली आहे, ती बातमी म्हणजे या प्रकल्पामुळे रस्त्यावर अवजड वाहने किती येतात. ग्रामीण भागात सर्वात जास्त म्हणजे १५ टनाची वाहतुक होऊ शकेल. पण येथे ४०टनापर्यंत वाहतुक होते / येते. प्रकल्प प्रवर्तकांनी उत्पादन विस्तारिकरणाचा विचार केलेला आहे. ६०० मेट्रिक टन ते २००० मेट्रिक टन (६,१७५ ते २०,०९०.९४ ) हे फिनिश प्रॉडक्ट आहे. फिनिश प्रॉडक्ट घेऊन जाण्यासाठी वाहनांची संख्या किती आहे याचे स्पष्टीकरण तज्ञ अभ्यासगटाने द्यावे. प्रकल्पाच्या उत्पादनासाठी कच्चा माल व इंधन लागते. म्हणजे येथे इंधनासाठी कोळसा लागतो. दररोज ४६५ टन कोळसा जळणार आहे. किती कार्बन निर्माण होईल? पण त्यासाठी गावात किती ट्रक्स येतील्याचे नियोजन प्रकल्प सल्लागार यांनी दिलेल्या पार्किंग व्यवस्थेवरून लक्षात येईल का? सांगणे गरजेचे आहे. इंधनासाठी लागणाऱ्या कोळश्याची खरेदी वर्षातून एकदा किंवा दोनदा केली जाते. तो कोळसा येथे साठवला जातो. त्याची वाहने ही रस्त्यात उभी राहतात. त्यावेळेस रस्त्यावरून गाडी जाण्यास जागा नसते,

त्यांच्याकडे स्वतःची सिक्युरिटी आहे अश्या सर्व परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला गाडी काढताना काय त्रास होतो, ही परिस्थिती आपण बघितलेली योग्य राहील.

आमच्या गावात रेल्वे फाटक ते गाव हा रस्ता एकेरी आहे. त्या रस्त्याच्या कडेला गावातील गरीब पोट भरत असतात. प्रकल्पासाठी येणा-या व जाणा-या वाहनांमुळे त्याच्या व्यवसायावर गदा येणाच्या प्रकार होत आहे.तरी दुसरा पर्यायी रस्ता करता येईल काय याचा विचार प्रकल्प प्रवर्तक यांनी करणे महत्वाचे आहे. या फ्रंट गेट पासून ते नदीच्या पात्रापर्यंत या प्रोजेक्ट मध्ये प्रॉपर्टीचे डिमार्केशन करून दाखवलेले आहे. गावनकाशा बघितला तर त्यामध्ये समांतर रोड आहे तो रस्ता या प्रकल्पाच्या क्षेत्रफळामध्ये दाखवलेला आहे. पर्यायी रस्त्याचा विचार केला गेला पाहिजे. विस्तारिकरण करताना प्रकल्प ग्रस्तांनी केलेली मागणी योग्य वेळी विचारात घेत नसतील तर त्यासाठी आजुबाजुच्या लोकांना कोर्ट कचेरी थोटविण्याची वेळ येत असेल तर प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्वी केलेल्या चुका विचारात घ्याव्या लागतील. सीएसआर आणि सीईआर यासाठी इतका खर्च करतो, खर्च केलाय ह्या गोष्टी विश्वासाहार्य नाहीत.

येथून निघणारे पाणी, उत्पन्न होणारे सांडपाणी, येथे जिरवण्यासाठी असणारे क्षेत्रफळ, हरित पट्टयासाठी निघणारे पाणी क्षेत्रफळ , झाडांची संख्या यात सर्व तफावत आढळते. हे प्रकल्पासाठी योग्य क्षेत्र नाही. तरी पर्यावरण समितीस विनंती आहे की पैठण धरणाचे सर्व पाण्याचे नमुने गोळा करण्यात येऊन, सदरहू प्रकल्पात उत्पादन करतात, त्याचे रेसिडयु काही आढळतात का याची तपासणी करावी.

यावेळी एका महिला उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की सदरहू गृहस्थ हे फारवेळ बोलत असून इतरांनाही बोलायचे आहे. येथे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समितीय यांनी उपस्थितांना सांगितले की जी मुद्दे योग्य आहेत, तरी लेखी निवेदन दिल्याने सर्व सांगायची गरज नाही. नविन मुद्दे असल्यास तेच मांडावेत. अगदी थोडक्यात मांडावेत.

त्यांनी ध्वनि प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करताना सांगितले की कारखान्याच्या बाजूने नागपूर - पुणे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग जातो. तो २०२१ ला कार्यान्वित होईल. तर शासनाने समृध्दी महामार्गात ध्वनि प्रदूषणाचे आणि हवा प्रदूषणाचे जे घटक घेतले, त्याचा येथील पर्यावरण प्रभाव मुल्यांकन

अहवालात समावेश नाही. समृध्दी महामार्ग सुरु झाल्यावर होणाऱ्या प्रदूषणाचा विचार गोदावरी बायोरिफायनरीज यांच्या विस्तारिकरणासाठीच्या अभ्यासात नाही.

तसेच आजूबाजूच्या साईनाथ ॲग्रो, मौनी ॲग्रो किंवा खत तयार करणाऱ्या इतर कंपन्यांतून उत्पन्न होणारे सांडपाणी, कचरा,त्यांचा ईआयए रिपोर्ट व एमपीसीबी रिपोर्ट यांची व या गोदावरी प्रकल्पातील सांडपाणी व कचरा यात फरक असेल तर ती तफावत निर्माण होईल. असे वेगळे निरीक्षण केंद्रीय समितीकडे पाठवता येतील का? अशी माझी मुख्य तक्रार आहे. याबाबत पर्यावरण सल्लागार यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मार्गदर्शन करावे.

२) **<u>श्री अशोक नारायण टेके,वारीगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

आज प्रकल्प प्रवर्तक गोदावरी बायोरिफायनरीज यांच्या विस्तारिकरणासाठी जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. अशी सुनावणी २००१ मध्ये झालेली होती व त्यावेळी मुद्दे उपस्थित केलेले होते.तेच आता उपस्थित करतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गोदावरी नदी व गावठाण यांचे अंतर किती याचा खुलासा करण्यात यावा. आपण दिलेल्या माहितीच्या आधारे ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा आणि वाऱ्याची गती पश्चिमेकडून वायव्ये पूर्व सुचवली आहे. ती गती कारखान्यापर्यंत सुचवली आहे. पण कारखान्याच्या पुढे पर्यंत वारे त्याच गतीने वाहत असतात. त्या वाऱ्याबरोबर जाणारी धुळ, इतर धूलिकण आणि दूषित हवा त्या परिसरात तसेच त्यापेक्षा पुढे मोठ्या प्रमाणात वाहते.

त्यांनी पुढे मुद्दा उपस्थित केला की जमिनीखाली पाण्याची चाचणी केली. मात्र किती फुटांपर्यंत जाऊन पाण्याचे नमुने गोळा केले याबाबत काहीही उल्लेख नाही. पाण्याची पातळी किती फुटांपर्यंत खराब आहे वा चांगली आहेत्याचा सामु किती आहे याची माहिती द्यावी.

माती परिक्षणाची माहिती अत्यंत चुकीची आणि माती परीक्षणाच्या अहवालाच्या विरोधातील वाटते.

ध्वनी प्रदुषण कारखान्यात ठराविक ठिकाणी जास्त आहे आणि कारखान्याबाहेर त्याचे प्रमाण कमी आहे अशी जी माहिती दिली आहे ती योग्य नाही.

१० कि.मी. परिघाच्या परिसराचे जे त्यांनी सर्वेषण केले, त्यामध्ये गावातील बराचश्या गोष्टी नाहीत जसे आमच्या गावातील काही भूखंड हे वनविभागाचे

आहेत. त्याचा उल्लेख पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात नाही.
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना संबंधित गावाचे तलाठी आहेत काय याबाबत विचारणा केली. श्री टेके यांनी सांगितले की गट नं.१२५, १२६ सहीनिशी असणारा उतारा सादर करत आहे.
श्री. टेके यांना आरोप केला की कारखान्याने चुकीच्या गोष्टी करवुन परवानग्या घेतलेल्या आहेत.
तरी सदरहू विस्तारिकरणास परवानगी देण्यात येऊ नये असे मत मी मांडत आहे.

३) **<u>श्री राहुल मधुकर टेके, राहणार- वारी, तालुका -कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर -</u>**

सदरहू प्रकल्प हा १९३९ साली स्थापन झाला. त्यावेळी तेथे उत्साहाचे वातावरण गावात होते. असे गावातील जुने लोक सांगत. परिसरात उद्योग आला की त्यामुळे परिसरात रोजगार मिळत असतो, व्यापाराची वृध्दी होत असते. त्यामुळे समाजातील वेगवेगळ्या घटकांना न्याय मिळत असतो. घरात खाण्यासाठी चूल पेटवावी लागते. तिचाही धुर घरात तयार होतो. म्हणून आपण चूल विझवून टाकत नाही. परिसरातील रस्त्यांची तसेच प्रदुषणाची परिस्थिती गंभिर आहे. तरी कारखान्याने त्यावर काम करणे गरजेचे आहे. परिसरातील रस्त्यांच्या विकासाची व्याप्ती वाढविणे जरुरीचे आहे, कारण कारखान्याची मोठी साधने भरपूर प्रमाणात येत असतात, त्याचा त्रास खुप असतो. लोकांचा रोष सहन करावा लागतो. मी ग्रामपंचायत सदस्य असल्याने लोकांच्या भावना मी जाणतो. जनतेचा रोष आम्हांलाही सहन करावा लागतो. समाजातील प्रतिष्टित व्यक्ती, उद्योजक हे परदेशात जाऊन तेथील तंत्रज्ञान भारतात आणून उद्योग सुरु करण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण व्यापार वाढणे हे महत्वाचे आहे. कारखान्याच्या माध्यमातून काही प्रकल्प येत असतील तर त्याचे जरूर स्वागत करू.
तर विस्तारिकरणामुळे जर व्यापार परिसराचा वाढत असेल तर त्याचे स्वागत आहे. मात्र कारखान्यानेही काही गोष्टींवर लक्ष ठेवले पाहिजे. सीएसआर फंड खर्च करताना गावातील लोकांना विश्वासात घेऊन तो खर्च केला आणि अधिक

चांगल्या प्रमाणात काम केले तर प्रसंगी जो विरोध होतो एकप्रकारचा रोष असतो तो रोष व्यवस्थापनावर होणार नाही. लोकांचा रोष कमी होईल.
प्रकल्प जुना असल्याने पाण्याची पातळी तसेच त्यावेळी पाण्याचे आणि हवेचे जे प्रदूषण झाले, जे नुकसान झाले,ते परत होऊ नये. मात्र प्रकल्प वाढला तर रोजंदारी कामगार, कायम कामगार, उद्योगधंदे यांची वाढ होईल.
श्री राहूल टेके यांनी सांगितले जो गट नं. १९९ झाला, तर तेथे कारखान्याचे पाण्याचे तळे आहे. त्या परिसरातच आम्ही राहतो. ज्यावेळी जल प्रदूषण होण्याची शक्यता होती. त्यावेळी आम्ही कंपनी प्रशासनाला पाण्याच्या प्रदूषणाबाबत विनंती केली असता त्यांनी तळ्याची खोली १० फुटांना वाढवली व पाण्याची पातळी ही १० फुटापेक्षा जास्त ठेवली. त्यामुळे गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा त्याच तळ्यातूनच होत असतो. येथे कारखान्यच्यातीन्ही बाजूंचा विचार केला असता एका बाजूस गोदावरी नदी, दुस-या बाजूस कान्हेगाव व तिस-या बाजूस रेल्वेचा पलिकडचा भाग व एक बाजूला गाव. या चार विभागातील दोन विभागाच्या भागात शेती आहे. शेतीकडे - उत्तर भागात प्रदूषण होण्याचे प्रमाणे जास्त आहे. प्रदूषण झाल्याने काही लोक कंपनीविरुध्द कोर्टात गेले. व्यवस्थापनाने पण न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे. प्रदुषणामुळे ज्यांचे आर्थिक नुकसान होते. त्यांना कामाच्या स्वरूपात मोबदला किंवा दुसऱ्या पद्धतीने न्याय मिळेल यासाठी प्रयत्न केले तर भविष्यातील तक्रारी नक्कीच कमी होतील. तर कंपनीने त्यांचे नुकसान जर त्यांना व्यवसाय देऊन भरून काढले तर तेही कंपनीस सहकार्य करतील. प्रत्येकाला हा परिसर आपला कसा वाटेल यासाठी व्यवस्थापनाने काही तरी करणे जरुरीचे आहे. २०१८ साली शेती महामंडळाची जागा गावठाणास मिळावी अशी मागणी केली होती त्याची आठवण करून देतो.
प्रकल्प विस्तारिकरणास व रोजगारीच्या वाढीस व्यक्तीशः माझा पाठिंबा आहे.

**४) <u>श्री प्रमोद गुलाबराव शिंदे,</u>**

प्रकल्प प्रवर्तकांनी विस्तारिकरण करण्याचे प्रयोजन केलेले आहे, त्याबद्दल अभिनंदन. इथल्या तरुणांना रोजगार मिळेल, स्थानिकांच्या रोजगारात वाढ होईल. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना काही विनंती वजा सुचना केल्या –

सदरहू प्रकल्प हा केमिकल युनिट आहे. ते इतके मोठे आहे, तरीही येथील अधिकारी ते येथे राहत नाहीत. सर्वजण कोपरगावाहून रोज जाणे-येणे करतात.त्यांना विनंती आहे की त्यांनी येथे स्थायिक राहावे.

प्रकल्प प्रवर्तकांनीसीएसआर फंड किती आणि कशासाठी वापरला जाणार आहे याची माहिती गावाला द्यावी. तसेच येतील तरुणांना नोकऱ्या मिळाल्या तर सर्व गाव प्रकल्पास पाठिंबा देईल. तरी व्यवस्थापनाने गावातील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. गावाच्या अडचणी समजून घ्याव्यात. रस्ते चांगले करावेत.

सर्व गावाची इच्छा आहे की प्रकल्पाचे विस्तारिकरण व्हावे. विस्तारिकरणास पाठींबा आहे.

५) **श्री रावसाहेब चांगदेव टेके, राहणार - वारी गाव, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

प्रकल्प प्रवर्तकांनी १९३९ साली साखर कारखाना सुरु केला. १९६१ साली आसवणी प्रकल्प (DISTILLERY) सुरु केला. २०१३ ला पाण्याची टंचाई, प्रदूषणाचा प्रश्न उभा राहिला व २०१३ ला आसवणी प्रकल्प बंद करण्यात आला. गेली ३० वर्षे नियमित राजकीय व सामाजिक जिवनात काम करत असताना २०१६ ला समन्वयकाच्या नात्याने लोकांचे प्रश्न सुटले पाहिजेत आणि कारखाना ही चालला पाहिजे या न्यायाने कारखान्याच्या मालकांची भेट घेतली. प्रकल्प प्रवर्तक प्रत्येकाची वैयक्तिक बोलून वैयक्तिक प्रश्न सोडवितात. गावाच्या सामाजिक कार्यामध्ये प्रवर्तक तसेच अधिकारी यांनीही सहभाग नोंदवला आहे. १९६१ साला आसवणी प्रकल्प सुरु झाला व २०१३ ला बंद पडला. साधारण ५०-५५ वर्षे आसवणी प्रकल्प सतत कार्यरत होता. साधारण १५०-१७५ एकराचा परिसर वेगवेगळ्या झोन मध्ये आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर आताप्रमाणे हरित लवाद, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ह्या संस्था आता मानवतावादी व प्रदूषण नियंत्रणासाठी एवढ्या सक्रिय नव्हत्या. तेव्हा तंत्रज्ञान नव्हते. नंतर नविन निष्कर्ष आले. राजस्थानचे डॉ. राजेन्द्रसिंह, जलतज्ञ यांना बोलविण्यात आले. त्यांनी राजस्थान व उत्तर प्रदेशातील नद्यांचे पुनर्जीवन केलेले आहे. त्यांनी सर्व परिसराचे सर्वेक्षण केले, व व्यवस्थापनास काही सूचना केल्या. नाल्याची खोली वाढून परिसरातील वॉटर टेबल्स वाढवावे ह्या सूचना केल्या. दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी झाली नाही. जनसुनावणी तारीख निश्चित झाल्यावर सर्वांना विनंती केली ग्रामस्थांचे

अधिकृत म्हणणे पर्यावरण जनसुनावणी समितीसमोर गेले पाहिजे. त्यामुळे ग्रामपंचायतीने आपणास पत्र दिले. माझे चारच मुद्दे आहेत –

अ) या गावातील पाण्याचे स्त्रोत जे जलप्रदूषणामुळे खराब झालेले आहेत, पिण्याचे व शेतक-यांच्या वापराचे पाणी, त्याचा कालबध्द कार्यक्रम आखून पाण्याचे स्त्रोत साफ करणे,जलसंधारण वाढविले पाहिजे, येथील शेतकरी व कामगार दोघेही सुखी झाले पाहिजेत,

ब) कारखाना चालला पाहिजे. कारखान्याचे विस्तारिकरण झालेच पाहिजे. तरी प्रकल्प प्रवर्तकांना सूचना आहे की प्रकल्पासाठी आपण १५ कि.मी. परिघाचा धरतो. तसाच जो रस्ता ८-१० कि.मी. रस्ता आहे, संवत्सर मार्गे उमरावला जाणारे गृहस्थ आहेत, वारीतून पुलावरुन पुणतांबाला जाणारा रस्ता, ते आपण वापरत असलेले रस्ते दुरुस्त करुन योग्य प्रकारे वेळोवेळी त्याची डागडुजी करावी,

क) कारखाना आल्याने परिसरात सुबत्ता येते. त्या सुबत्तेचे स्वागत करतो. मात्र कारखाना अधिकारी या गावातच राहिले तरच येथे विविध व्यवसायात वाढ होईल. पण जर लोक कोपरगाव, श्रीरामपूरहून आले, तर या गावाला त्याचा काहीही फायदा नाही. सर्वजण येथेच राहिले, तर आमची बाजारपेठ फुलेल.

ड) गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. कोविडमुळे आपणा सर्वांनाच वैदकीय मदतीचे महत्व कळले. तरी चांगला दवाखाना असावा. विस्तारिकरणास माझा पाठिंबाच आहे. परिसरातील शेतक-यांचे व कामगारांचे प्रश्नच शिल्लक राहू नये. सर्व प्रश्न मार्गी लावले पाहिजेत.

६) **सौ. अलिस <u>दिवाकर निळे, वारी गाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

येथे कंपनीचा विस्तारासाठी ही जनसुनावणी आहे. प्रदूषण त्रास कोणालाच नको आहे. प्रकल्प एवढा मोठा कार्यान्वित आहे, व विस्तारिकरणाबरोबरच त्याची सुरक्षितता व प्रदूषण नियंत्रणाचा विचार प्रकल्प व्यवस्थापकांनी केलाच असेल. प्रकल्प प्रवर्तकांनी येथील शेतकरी, प्रकल्पातील कामगार व परिसरातील विकासासाठीच हा प्रकल्प आणला आहे.

त्याचप्रमाणे शासनाच्या परवानगीशिवाय कुठलीच गोष्ट सुरु करता येत नाही. करु शकतही नाही. १९३९ सालापासून परिसरातील सर्व लोक प्रकल्पात काम

करत आहेत, तर आपण इतर गोष्टींत लक्ष का घालायचे. जर शासनाची परवानगी नियम पाळावेच लागतात. परिसरातील डॉक्टर २०० ते ५०० रुपये घेतात. सोमय्यांच्या दवाखान्यात २० रुपये देऊन रोग्यास अतिउत्तम उपचार होतात. सोमय्या ग्रुप आरोग्य शिबिर आयोजित करते. पुढील वैद्यकिय सेवेसाठी मुंबईला नेऊन दोनदोन लाख खर्च करुन वैद्यकिय सुविधा पुरविली आहे. तरी मी विनंती करते-

अ) वर्षातून दोनदा आरोग्य शिबिरे लावावीत,

ब) मीही शेतकरी आहे. कोविडच्या संकटात लोकांच्या नोक-या गेल्या. मात्र कारखाना पाच दिवस बंद होता.पण सर्वांनाच पूर्ण पगार देण्यात आलेला आहे . आज एमआयडीसीतील बरेच कारखाने बंद पडले. त्यांनी कोविडमध्ये बंद ठेवले तर पगार कापला आहे. पगार नाही म्हणून लोक नोकरी सोडून घरी आहे. येथे तसे नाही असे येथील कामगार सांगतात. ज्यांना चांगले मार्कस् मिळतात, त्यांना सोमय्या यांनी फ्री शिक्षण दिलेले आहे.

क) तरी स्थानिक नागरिक म्हणून प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

७) **सौ. <u>सुवर्णा अशोकराव गजभिव, राहणार-साकरवाडी, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर,, सदस्य, वारी ग्रामपंचायत</u>-**

मी गृहिणी असून वारी ग्रामपंचायत सदस्य आहे. तरी मला माहीती सांगावी की -

हा प्रकल्प कुठे उभारणार आहेत,

ब) सीएसआरफंडात कुठली कामे करणार आहात. पूर्वी झाडे लावली, आता कुठे लावणार, कोणती लावणार, त्याचे प्रकार किती असतील, प्रकल्पासाठी पाणी कोठून आणणार, त्याची साठवण, त्याचप्रमाणे सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल. त्याचप्रमाणे ब-याच उपस्थितांनी सूचना केल्याप्रमाणे आरोग्य तपासणी शिबिर हे किती वेळा घेणार आहेत?

८) **<u>श्री. मच्छिंद्र टेके, राहणार-वारी गाव, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर, माजी सरपंच, वारी गाव</u> -**

श्री मच्छिंद्र टेके म्हणाले की आजची सुनावणी ही परिसरासाठी व प्रकल्पासाठी महत्वाची आहे. येथे काही तांत्रिक, कायदेशीर व सामाजीक मुद्दे आहेत.

जनसुनावणीमुळे उपस्थितांना आपल्या सूचना, आक्षेप नोंदविता येतात.जेव्हा ही नोटीस प्रकाशित झाली तेव्हा तांत्रिक माहिती देण्यासाठी एखादी कार्यशाळा आयोजित केली जाईल आणि या मार्गदर्शनासाठी एखाद्याची नेमणुक केली जाईल असे वाटले होते पण तसे काही झाले नाही. श्री. टेके यांनी १९३८-३९ पासून खंडकरी शेतक-यांरपासून सर्व माहिती सांगितली. त्यांनी सांगितले की येथील सामान्यांना तांत्रीक ज्ञान नाही. तरी प्रकल्पाचे नावे सांगावित. ग्रामीण भागातील कारखाना हा असून तो चाललाच पाहिजे. प्रकल्प प्रवर्तकांचे असे म्हणणे आहे की प्रकल्पात ४०० लोकांना रोजगार आहे. विस्तारीकरण झाल्यावर अजून २०० लोकांना रोजगार मिळेल. २००० लोक त्यांच्यावर उपजिविका करतील. त्यामुळे त्यांच्यावर उपजिविका करणा-यांचाही व्यवसाय वाढेल. काही वर्षांपूर्वी प्रदूषण झाल्याने ज्यांचे नुकसान झाले, त्यांच्या बाबतीत कंपनीने सन्माननीय तोडगा काढावा, सर्व अन्यायग्रस्तांचे प्रश्न सोडवावेत. योग्य ती भरपाई प्रकल्पग्रस्तांना द्यावी. व येथे चांगले वातावरण करावे ही विनंती. यातूनही नविन प्रश्न निर्माण होणार आहेत. या प्रकल्पात पाण्याचा जो वापर होईल नव्याने २,६९१.० घनमीटर पाणी वापरणार आहेत. प्रक्रिया केलेले पूर्वीचे ३,०९२ घनमीटर पाणी पुन्हा वापरणार आहे. म्हणजे रोज २६ लाख लिटर्स पाणी वापरणार. म्हणजे वर्षाला ९५ कोटी लिटर्स पाणी वापरणार. जे प्रक्रिया करुन पाणी वापरणार, ते ४०% पाणी वापरणार.

ते म्हणाले अध्यक्षमहोदय, हा कृषि विभाग आहे. हा रेनशॅडो झोन आहे. येथे पाऊस फारच कमी पडतो. चालू वर्षांचा पावसाळा हा अपवाद आहे. जेव्हा पाऊस कमी पडतो, त्यावेळी पिण्याच्या पाण्याचे टॅंकर्स सुरु करावे लागतात. शेती ओसाड झालेली असते, त्यावेळी पाणी फक्त जपून वापरणे हाच उपाय असतो. तर आपण पूर्वीचे ३,०९२ घनमीटर पाणी वापरणार आहे. तर एकूण ८०%पाण्याचा पुनर्वापर करावा. नविन पाणी कमीतकमी वापरावे, अशी सूचना आहे. प्रकल्प प्रवर्तकांच्या सल्लागार यांनी सांगितले की पाटबंधारे खात्याची परवानगी डाव्या कालव्यातून पाणी उपसण्याची आहे. मात्र मंजूरीपेक्षा जास्त पाणी वापरले जाते असाही आरोप होतो. येथे जे जलप्रदूषणाचे प्रश्न निर्माण झाले, ,ते टाळण्यासाठी ८०% पाण्याचा पुनर्वापर सक्तीने करण्यात यावा. त्यासाठी आपण गुंतवणुक करावी.

श्री टेके म्हणाले की हवेचे प्रदूषणाबाबत उपाययोजना जरी सांगितल्या, तरी आमचे समाधान झालेले नाही. कोविडचा काळ आहे. जे रोगी दगावले, ते प्राणवायूच्या कमतरतेमुळे.तरी प्राणवायू पुरविणारी झाडे लावणे आवश्यक आहे. प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले की २०० कोटींचा प्रकल्प आहे आणि त्यातील पाऊण टक्के म्हणजे १.५ कोटी रुपये सामाजिक बांधीलकीसाठी आपण वापरणार आहोत. पाणी, व रस्त्यांचे प्रश्न गंभीर आहेत. आपणास रस्तादुरुस्तीचे काम सामजिक बांधिलकी म्हणून करावे लागेल. तर ६० टन वाहतुकीचे रस्ते करावे लागतील.

श्री. टेके यांनी सांगितले सोमय्या ग्रुप दरवर्षी त्यांच्या धर्मादाय ट्रस्टमधून शिबिरे भरवत. सध्या ती बंद केलेली आहेत. स्थानिकांचे असे म्हणणे आहे की वर्षातून एक नाही तर दोन शिबिरे घेतली पाहीजेत. गोरगरीबाला उपचार मिळतात व दुर्धर आजार असल्यास व तो ह्या शिबिरात समजल्यास त्यास पुढील उपचार धर्मादायकडून घेता येतात.

हा भाग ग्रामीण असला तरी गुणवत्तेत कमी नाही. या गावात ९७% पर्यंत मार्क्स मिळविणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत. ती गरिबाची मुले असतील तर सामाजिक दायित्व म्हणून आपण पुढाकार घ्यावा. कोविडच्या काळात सर्व शाळा बंद आहेत. ऑनलाईनसाठी शिक्षण चालू केलेले आहे. परिसरातील ४०%मुलांकडे एन्ड्रॉईड मोबाईल नाहीत, ते घेऊ शकत नाहीत. ते शिक्षणापासून वंचित राहणार. आपणास सूचना आहे की आपण अंदाजपत्रकात १-२ कोटींची तरतुद करा. याचा उपयोग परिसरासाठीच करा. उद्योगात स्थानिकांना , भूमिपुत्रांनाच नोकरी प्राधान्य, रस्ते दुरुस्ती, पाण्याचा पुनर्वापर, आरोग्य शिबिरे, व दरवर्षी अंदाजपत्रकात सामाजिक दायित्वाखाली एक कोटीची आर्थिक तरतुद करावी हे मुद्दे अहवालात यावे. सदरहू प्रकल्पाच्या विस्तारिकरणास आमचा सशर्त पाठिंबा राहील.

त्यांनी सांगितले की ग्रामपंचायतीस जो निधी मिळतो, तो लोकसंख्येच्या आधारावर मिळतो. वारी गावाची लोकसंख्या कमी होत आहे. आमची वारी गावचीपाणीपुरवठा ही योजना कमी लोकसंख्येमुळे मंजूर होत नाही.

कारखान्याच्या लोकांनी इथेच राहावे. व्यवहारामुळे गावातच चलन फिरत राहील. लोकांनी गावातच राहिले पाहिजे हे सक्तीचे केले पाहिजे. गावात छोटे छोटे व्यवसाय असणारे बरेच लोक आहेत. हे गाव अल्पसंख्याकाचे आहे, दीनदुबळ्याचे

आहे. आम्ही गुण्यागोविंदाने राहतो. आम्ही सामाजिक सलोखा ठेवला. तरी प्रगतीसाठी विस्तारिकीकरणास पाठिंबा देत आहोत. त्यांना सशर्त परवानगी द्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की आपण चांगले मुद्दे मांडले असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

९). **श्री रामदास वामन सोनवणे, माजी उपसरपंच, वारी गाव, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः**

त्यांनी सूचना केली की नागरिकांना जगण्यासाठी जीवनमान आवश्यक असते त्यामध्ये हवा, पाणी शुध्द स्वरुपात मिळणे आवश्यक आहे. हवा शुध्द राहण्यासाठी झाडांची, गवताची वगैरे आवश्यकता आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून प्रदुषण थांबवण्यासाठी झाडे, वेगवेगळ्या वनस्पती , वेगवेगळी गवत लावावीत. प्रदुषण थांबवण्यासाठी अजून काही उपाययोजना असतील तर त्या राबविण्याची गरज आहे.

कामगारांना कौशल्य विकास प्रशिक्षण वेळोवेळी कारखान्यात देण्यात येते. कारखाना ISO ९००१ कडे वाटचाल करत आहे, प्रशिक्षण कामगारांपुरते मर्यादित न राहता ते परिसरातील नागरिकांना पण देण्यात यावे. बाहेरून प्रशिक्षक आणून प्रशिक्षण द्यावे. कामगारांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक उपकरणे बसविण्यात आलीत. त्यात वाढ करण्यात यावीत. त्याचेही प्रशिक्षण कामगारांना देण्यात यावे.

त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी म्हणून स्थानिक महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे उदा- काही कंपन्या देतात तसे कागदी पिशव्या बनविणे वगैरे. तसे उपक्रम राबवावेत. त्याचप्रमाणे कारखाना १० वी १२ वीतील मुलामुलांनी चांगले मार्क्स मिळविले की प्रोत्साहित करण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. असे उपक्रम चालू ठेवावेत. स्थानिक सामाजिक गरजा लक्षात घेऊन जनसुनावणीत चर्चा झाल्यानुसार रस्ते दुरुस्ती करून देण्यात यावेत. मूलभूत गरजा भागविण्यासाठी १.५ कोटी निधी राखीव ठेवण्यात येणार आहे, तो वाढवावा.

१०) **श्री. नामदेव खंडु जाधव, गाव-वारी, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-**

आज जनसुनावणीसाठी परिसरातील बरेच नागरिक व शेतकरी बंधु आलेले आहेत. त्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. गावातील आमच्या लोकांना तांत्रिक बाबी समजणार नाही. पण त्यांनी सामजिक उपक्रमांसाठी केलेली अपेक्षा सोमय्या ग्रुप होता म्हणूनच केली. येथील स्थानिक कारखाना जावा असे वाटत नाही. किंबहुना कारखान्याची भरभराट व्हावी अशीच त्यांची इच्छा आहे. साखर मंथनातून प्रकल्प प्रवर्तकांनी कामधेनू सुरु केलेली आहे. त्यातून नोक-या उपलब्ध होऊन भरभराट होणार आहे.

११) **<u>श्री. प्रकाश सदाशिव करडे, राहणार-कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर-</u>**

त्यांनी १९९५ साली वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेनचा करार व जगातील मोठ्या कंपन्यांनी चीनमध्ये उघडलेले उद्योग व भारतातील केमिकल कंपन्यांना लागलेली घरघर या सर्वांचा ऊहापोह करुन सांगितले की सोमय्या ग्रुपने मात्र या अडचणीतही उद्योग चालू ठेवला. आता विस्तारिकरणही प्रस्तावित आहे. विस्तारिकरणामुळे जर कंपनीचा व परिसराचा फायदा होत असेल तर ते विस्तारिकरण पुर्ण व्हायलाच पाहिजे. तरी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सर्व नियम पाळून विस्तारिकरण व्हावे. प्रत्येक कामगारांशी सोमय्या यांनी जिव्हाळ्याचे संबंध ठेवले. त्यांनी व्यवस्थापनास आवाहन केले की आपला कारखाना ही ग्रामीण भागात आहे याची जाण ठेवावी. येथील मुली मुले हुशार आहेत. मात्र सकाळी शाळेत गेल्यावर दुपारी त्यांना शेतात जाऊन राबावे लागते. ते शहरी मुलांपेक्षा कमी मार्क्स मिळतात, तर स्थानिक मुलांबाबतीत सर्व परिस्थितीचा विचार करुन आपल्या ग्रुपमध्ये भरती करताना त्यांना प्राधान्य देण्यात यावे. त्यांनी अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती व कंपनी व्यवस्थापकांना रस्ता दुरुस्ती व दोन पदरी रस्ता विकसित करण्यास सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे प्रदूषणाचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी कंपनी व ती व्यक्ती यांनी वेळोवेळी परस्पर बैठक घेऊन सलोख्याने प्रश्न सोडवावेत.त्यांनी सर्वांना विस्तारिकरणास पाठिंबा दिला.

**१२) श्री. ताराचंद हैबती पलघडमलरा -**

विस्तारिकरणावर बहुतांश लोकांचे जीवनमान आहे. साखर कारखाना गेला. आसवणी प्रकल्प गेला. एसिड प्रकल्प गेला. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी हिंमतीने पुढे प्रकल्प चालू ठेवला. गावात पाण्याचा प्रश्न बिकट होता. प्रकल्प प्रवर्तकांनी आपली जागा देऊन तो पूर्णत्वास आणला. स्थानिक गरीब मुलांकडे पैसे नसतील, तर त्यांनी लाख लाख रुपये देऊन त्यांना मदत केलेली आहे. तरी उपस्थितांनी विस्तारिकरणास पाठिंबा द्यावा ही विनंती.

## दुसरे सत्र

दुपारचे सत्र सुरु होताना संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आपले पर्यावरणविषयक मुद्दे थोडक्यात सांगण्याचे आवाहन केले. ही जनसुनावणी पर्यावरणविषयक आहे.

**१) श्री. दिवाकर सखाराम निळे, राहणार- वारी गाव, तालुका -कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर, माजी उपसरपंच, वारी गावः-**

गावात पाण्याचा प्रश्न बिकट होता. १९९६पासून आम्ही पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याचा प्रयत्न करत होतो. जागा नव्हती. प्रकल्प प्रवर्तकांनी आपली ५ एकर जमिन पाणी पुरवठा योजनेसाठी दिली. स्थानिकांना शैक्षणिक, सामाजिक आणि वैद्यकीय फायदे द्यावेत. आमची प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

**२) एड्व्होकेट असिम सरोदे, पुणेः-**

यावेळी, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत आवाहन केले की फक्त पर्यावरणविषयक बाबी उपस्थित करण्यात याव्यात. तरी मुद्दे थोडक्यात मांडावेः-

एडव्होकेट असिम सरोदे यांनी सांगितले की

अ) कार्यकारी सारांशच्या पान ५ वर Lead Acid हे CHWTSDF येथे विल्हेवाट लावण्यात येईल असे सांगितले आहे. मात्र हे पूर्णपणे चुकीचे आहे. बॅटरीज ऍक्ट लागू होत असल्याने Lead Acid बॅटरी हे बॅटरीएक्टप्रमाणे विल्हेवाट लावणे गरजेचे आहे, विल्हेवाट हि अधिकृत Lead Acid बॅटरी रिसायकलर लावणे आवश्यक आहे कारण ते घातक घनकचरा मध्ये लिस्टेड आहे.याची नोंद घावी.

ब) पाण्याची गुणवत्ता - पान नं.९ वर -आक्षेप - लेखी दिलेला आहे- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल (EIA Report) मध्ये नोंद का केली नाही.

क)वॉटर बजेट दिलेले नाही. उपचारीत सांडपाण्याचा वापर बागकामासाठी करणार आहेत. पूर्वीचे २०० घनमीटर पाणीबागेसाठी वापरात होते हे जर आपण समजलो तर ती बाग कुठे आहे? हा प्रश्न आहे व आताचे २५० घनमीटरपाणी, अतिरिक्त पाणी ५० घनमीटर पाण्यासाठी बाग कुठे निर्माण करणार हा प्रश्न आहे, कारण

महत्वाचा भाग आहे की हे विषारी पाणी असल्याने त्यातून बाग फुलुच शकत नाही. सांडपाणी म्हणून प्रक्रियाशिवाय ते पाणी बागेसाठी वापरल्यास विषारी आहे, त्यामुळे—खराब होतंय हा प्रश्न आहे. लोकांचे भूगर्भातील पाणी पूर्णपणे खराब होतंय.

ड) Quality of Treated Effluent - काही परिमाण दिलेले नाहीत. ते देणे आवश्यक आहे. बीओडी, सीओडी ची आकडेवारी नाही. पावसाळ्यात नदीत सांडपाणी सोडणार नाही, असे हे कंपनीने बॉण्ड पेपरवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे लिहून द्यावे, ते लिहून देणार कि नाही हे सांगितले पाहिजे.

इ) सांडपाणी गोदावरी नदीत एकदाही गेल तरी मप्रनि मंडळ कंपनीविरुध्द गुन्हा दाखल करेल, असे लिहून द्यावे,

ई) ईआयए मध्ये बरीच माहिती दिलेली नाही. प्रकल्प हा झेडएलडी प्रकल्प आहे हे पूर्णपणे खोटे आहे. स्क्रबर बद्दलची माहिती पूर्ण दिलेली नाही. वायू संदर्भातील ॲबसॉर्बर्स आहेत का नाही याची माहिती ईआयए मध्ये दिलेली नाही.

उ) नविन रसायन तयारकरण्याची कोणतीही प्रक्रिया येथे दिलेली नाही.

ऊ) एक चार्ट मराठीतील डॉक्युमेंट मध्ये इंग्रजीत दिलेला आहे, एवढ्या एका कारणावरून फक्त पुन्हा जाहिर जनसुनावणी घ्यावी लागू शकते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तो चार्ट इंग्रजीत असल्यामुळे इथे जमलेल्या पैकी कोणालाही समजलेला नाही, मलाही समजलेला नाही. तो मराठीत दिलेला नाही. तो देणे आवश्यक आहे. नाहीतर परत जनसुनावणी घ्यावी लागेल,

ए) हवा मॉनिटरिंगचा रिपोर्ट नाही, सांडपाणी कुठे टाकणार याचा उल्लेख नाही.मप्रनि मंडळाने कंपनीस सांडपाणी हे अपस्ट्रीमलाच (प्रवाहाच्या विरुद्ध) टाकावा असा नियम द्यावा. नदीच्या डाऊनस्ट्रीमचे पाणी घेतले तर चालेल. अशा उपाययोजनांमुळे नदी स्वच्छ राहील. झेडएलडीचा दावा चुकीचा आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की मुद्दे खूपच छान मांडले, त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

**३) <u>श्री. अशोक चांगदेव बोरडे, गाव-वारी, तालुका- कोपरगाव, जिल्हा - अहमदनगरः-</u>**

कंपनी चांगले काम करते. त्याचप्रमाणे कामगार व स्थानिक अडचणीत असले तर त्यास आर्थिक व इतर मदत करतात. जे वैद्यकीय शिबिर घ्यायचे, ते

परत घ्यावे. पूर्ण गावाला कंपनी पाणी पुरवते, ही कंपनी अजून दहापटीने वाढावी, त्यासाठी वारी ग्रामस्थांचे काही म्हणणे नाही. वारी गावातील श्री. रामेश्वर विद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांची फी भरावी ही विनंती.

**४) श्री. रमेश भागवत टेके, राहणार-वारी, तालुका- कोपरगाव, जिल्हा - अहमदनगरः-**

कारखान्यापासून ५०० मीटर्सवर माझी वस्ती आहे. बॉयलरमधून निघणारी राख, रात्री निघणारे भेसूरवायू आणि पिण्याचे पाणी हे सर्व खराब झाले आहे. आम्ही वेळोवेळी मप्रनि मंडळाकडे तक्रारी केलेल्या आहेत. त्या प्रलंबित आहेत.
करोनामुळे मप्रनि मंडळाने आम्हाला सांगितले कि तुम्ही येण्याची गरज माही आम्ही तुमचे प्रकरण पाठवून देऊ परंतु त्याची कुठलीही दखल घेतली गेली नाही.आमचा प्रश्न सुटल्याशिवाय या विस्तारिकरणास आमची हरकत आहे याची नोंद घेण्यात यावी. तदनंतर सुद्धा आपण अट्टाहास करून याचा विपरीत परिणाम केला तर आम्ही प्रदूषणग्रस्त शेतकरी प्रदूषण मंडळास साक्षीन कारखान्यासमोर आत्मदहन करणार आहोत.

**५) श्री. राजेन्द्र कचरू गायकवाड राहणार-वारी, तालुका - कोपरगाव, जिल्हा - अहमदनगर-**

कारखाना व गाव ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. गाव आहे म्हणून कारखाना आहे. कारखाना आहे म्हणून गावाला रोनक आहे. कारखाना गरजु लोकांना, विद्यार्थ्यांना कायमच मदत करत आलेला आहे. गावाला पाणी पुरविण्याचे काम कंपनी करते. त्याचप्रमाणे गावात अंत्यविधीचा सर्व खर्चही करते. त्यांनी कंपनी व्यवस्थापनला विनंती करतो की-
मुंबईत जसे कॉलेज सुरु केले, तसे त्यांनी येथे सुरु करावे. येथे अत्याधुनिक दवाखाना सुरु करावा, पिण्याचा पाण्यास मदत केली, तसा तो कायम स्वरुपी प्रश्न सोडवावा. येथे सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस फक्त पर्यावरणविषयकच मुद्दे उपस्थित करण्याची सूचना केली.

विस्तारिकरणास आमचा पाठिंबा आहे. कारण गावातील लोकांना नोक-या मिळतील, काम मिळतील, गावाचा विकास होईल. काही लोकांचा हरकती असतील तर तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे.

६) **<u>श्री. हिमंतराव रंगनाथ भुजंग,माजी सरपंच, वारी गाव, तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर</u> -**

उपस्थितांपैकी खूप लोकांनी सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. मी येथे सूचना करतो की प्रकल्प प्रवर्तकांना अतिशय सुंदर हरितपट्टा विकसित केलेला आहे. त्यात आपण भर टाकून जास्त झाडे लावू. प्राणवायूचे प्रमाण वाढवू. विस्तारिकरणास पाठिंबा.

७) **<u>श्री. दत्तात्रय लक्ष्मण टेके, वारी गाव, तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-</u>**

प्रकल्प प्रवर्तक पर्यावरणासाठी नेहमीच जागरुक आहेत. गेल्या वर्षी ३,५०० ट्री-गार्डस् दिले, झाडे दिली. झाडे लावली तर प्रदूषण कमी होईल. गावातील मुलांना शिक्षणात मदत करून त्यांचा विकासाचा नेहमीच हातभार लावतात. ७५% पेक्षा जास्त मार्क्स मिळविणा-या विद्यार्थ्यांना कंपनी जे अनुदान देते, ते योगदान आणखी वाढवून त्यांना प्रोत्साहन द्यावे.–वैद्यकीय शिबिरांची वाढ करावी. आमचा प्रकल्पाच्या विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

८) **<u>श्री. जालिंदर नामदेवजगताप, राहणार-कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-</u>**

मी गावकरी म्हणून सांगतो प्रकल्पामुळे गावाचा विकास झालेला आहे. प्रकल्पाने अतिशय सुंदर हरित पट्टा विकसित केलेला आहे. प्रकल्प हा प्रदूषण नियंत्रण करण्याची काळजी घेत आहे. आमचा विस्तारिकरणास पूर्ण पाठींबा आहे.

९) **<u>श्री. संजयकुमार पुनमचंद ठाकूर, राहणार- साकरवाडी, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर</u> -**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकडून आपल्या कंपनीत नोकरी मिळाली. कंपनीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आम्हांला प्रशिक्षणास पाठविले, स्टायपेंड दिलाव नंतर नोकरी दिली. विस्तारिकरणामुळे रोजगारात वाढ होईल. माझ्यासारख्या गरजुंना नोक-या मिळतील. विस्तारिकरणास आमचीआमचा पाठिंबा.

१०) **श्री. दिलीप बापुराव देशमुख, राहणार- साकरवाडी, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-**

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की उत्पादनात तयार होणारे सांडपाणी हे प्रक्रिया करून उत्पादनात व हरित पट्ट्यासाठी त्याचा पुनर्वापर करण्यात येतो. हे प्रक्रिया केलेले सांडपाणी कुठल्याही स्तराला अपायकारक नाही. येथील हजारो कुटुंब या प्रकल्पावर पोट भरत आहेत. प्रकल्प प्रवर्तक परिसरात सामाजिक कार्य करत आहेत. काही लोकांनी प्रदूषणाबाबत तक्रार केली.मात्र हेही लक्षात ठेवावे की जगात उद्योग उभारला तर त्यात त्रास होतो. आपण येथे झाडे लावलेली आहेत.आम्ही ह्या कारखाना परिसरात राहतो परंतु आतापर्यंत आम्हाला कोणताही अपाय झालेला नाही.

येथे उपस्थितांनी सूचना केली परिसरातील रस्ते कारखान्याने दुरुस्त करावेत. पण जर शासन आमच्याकडून टॅक्स घेते, तर कंपनी कसे रस्ते बांधणार. जर रस्ते बांधून पाहिजे, तर शासनाने कारखान्याचा रोड टॅक्स रद्द करावा. पाणी, वैद्यकीय सुविधा देण्याचा काम शासनाचे आहे. तरी आपत्कालिन परिस्थितीत कारखाना मदत करत असतो. माझ्या व परिसरातील दीनदुबळे मजूर यांच्यावतीने मी विस्तारिकरणास पाठिंबा देत आहे.

११) **सौ. राजश्री राजेश त्रिभुवन, राहणार -साकरवाडी गाव,तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-**

आमचा प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा आहे. त्याचप्रमाणे पुढील शिक्षणासाठी गावातील मुलांना कोपरगाव, श्रीरामपूर येथ जावे लागते. मुले धावपळीतून आजारी पडतात. येथे मोठ्या दवाखान्याची सोय नाही.तरी येथे पुढील शिक्षणाची व दवाखान्याचीसोय करण्यात यावी. त्याचप्रमाणे असाही प्रकल्प

आणा की त्या प्रकल्पात महिलांनाही काम करण्याची संधि द्यावी हि विनंती. प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा.

**१२) <u>रुपाली अनिल विसपुते, राहणार - साकरवाडी गाव,तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-</u>**

परिसरातील काही महिलांना रोजगार आहे परंतु, बऱ्याच महिला या बसून आहेत. तर असा प्रकल्प आणावा की त्यात महिलांनाही संधि मिळेल. प्रकल्प विस्तारिकरणास आमचापाठिंबा आहे.

**१३) <u>श्री. जालिंदर भाऊसाहेबशिरसाठ, राहणार-वारी गाव, तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-</u>**

माझा प्रश्न मप्रनि मंडळास आहे. गेल्या वर्षी कारखान्यास कारणे दाखवा नोटीस बजावली. <u>आणि</u> आता कंपनीने <u>एका वर्षात पर्यावरणाविषयी</u> काय कार्यक्रम राबवविला की आपण आता सुनावणी घेत आहात<u>याचे सविस्तर उत्तर दयावे</u>?

## <u>१४) श्री. संदीप रामभाऊ रक्ताटे रा. कोकमठाण शेतकरी,</u>

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरणाचा विचार करुन बरीच झाडे लावलेली आहेत. त्यांनी तश्याच प्रकारे हरितपट्टा विकसित करावा. प्रकल्प विस्तारिकरणास आमचा पाठिंबा आहे.
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की लेखी स्वरुपात सूचना, आक्षेप नोंदवायचे असतील तर ते नोंदवावेत. काहींना बोलणे होत नाही. त्यांनी ते लेखी दिले तरी चालेल.

**<u>१५) श्री. अशोक तात्याबा काजळे, राहणार-कान्हेगाव, तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर-</u>**

आमचा प्रकल्पाच्या विस्तारिकरणास पाठिंबा आहे. असे कारखाने ग्रामीण भागात यावे व त्यांचे विस्तारिकरण व्हावे. ग्रामीण भागात नवीन खाजगी

कारखाने येत नाही. त्यामुळे जुने कारखाने पूर्ववत चालू राहिले पाहिजे तसेच त्यांचेविस्तारिकरण होणे गरजेचे आहे.

**<u>१६) श्री. संजय सुभाष जाधव, राहणार- वारीगाव, तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर, ग्रामपंचायत सदस्य, वारी-</u>**

हा प्रकल्प कुठे होणार आहे? या प्रकल्पास किती पाणी लागणार आहे? ते पाणी साठवणार कसे? कोठुन आणणार? या प्रकल्पा वीज किती लागेल? या प्रकल्पास सर्व गावक-यांचा पाठिंबा आहे. प्रकल्प गावासाठी खूप करत आहे. येथील स्थानिक लोकांना रोजगार मिळावा. प्रकल्प प्रशासनास विनंती आहे की रामेश्वर विद्यालयातील शाळेची फी भरावी व त्या शाळेची दुरुस्ती आवश्यक आहे, ती करावी. कारखाना गावासाठी वेळोवेळी खूप मदत करतो.प्रकल्प अधिकारी हे बाहेरगावी राहतात. त्यांनी येथे राहावे. त्याचा फायदा गावाला होईल. प्रकल्पास पुर्ण पाठिंबा आहे.

**<u>१७) श्री. चारुदत्त रघुनाथ सिनगर, राहणार-भोजडे,तालुका - कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर</u>**

मी <u>भोजडे</u> गावाचा प्रतिनिधी म्हणून बोलत आहे. आमचे गाव दोन कि.मी.हवाई आंतर लांब आहे. या प्रकल्पामुळे आजूबाजूच्या ३ ते ४ किलोमीटर परिघातील गावांना याप्रकल्पातील पाणी व हवा प्रदूषणाचा त्रास नाही का? आमचे असे म्हणणे आहे की या प्रकल्पाचा आमच्या मानवी जीवनावर, गावाच्या पाण्यावर, हवेवर,पीक सरंचनेवर परिणाम होणार आहे. म्हणून आमचा या प्रकल्पाच्या विस्तारिकरणास विरोध करण्यासाठी येथे आलो आहे.त्याचप्रमाणे या जनसुनावणीची सूचना पुणे सकाळ पेपरमध्ये दिली. कोविडच्या काळात आमच्या गावात पेपर येत नाहित. आमचा यासाठी विरोध आहे कारण कि हा प्रकल्प काय आहे हे आम्हाला माहित नाही ग्रामस्थ घाबरलेले आहेत तरी यामुळे असंतोष होऊ शकतो तरी ग्रामपंचायतीची परवानगी प्रकल्पाविषयी चावडी वाचन करावे. तरी आमच्या परिसरातील ग्रामपंचायतींची परवानगी घेऊनच शासनाने हा प्रकल्पास मंजूरी दयावी.

**<u>१८) श्री. दौलत किशोर वाईकर, रा. वारीगाव स्थानिक शेतकरी</u>**

गेले ५० ते ६० वर्षांपासून आमच्या विहिरीचे व बोअरचे पाणी खराब झालेले आहे. आम्हांला प्यायला पाणी नाही. कंपनीस वारंवार फोन करावा लागतो. तरी कंपनीने विहिरीच्या पाण्याचे नियोजन करावे तसे अध्यक्षानी कंपनीला ठाम सांगावे व नंतरच विस्तारिकरणास परवानगी द्यावी. आमचा या विस्तारिकरणास जाहीर विरोध आहे. प्रकल्प सर्व सांडपाणी नदीत सोडते. तर मप्रनि मंडळाची परवानगी सांडपाणी नदीत सोडण्यास आहे काय? आम्ही पुरावे देऊन मप्रनि मंडळास कळविले, मात्र मप्रनि मंडळाने काहीहीआक्षेप घेतला नाही. पहिले प्रदूषणाचे प्रश्न मिटवावे नंतरच विस्तारीकरणास मान्यता द्यावी. असे ते म्हणाले. प्रथम स्थानिक शेतक-यांचा विषय मिटत नाही तो पर्यंत प्रकल्प वाढवण्यासाठी साठवण टाक्या वाढवण्यासाठी कोणतीही परवानगी देऊ नये. प्रकल्पाचे जास्त सामान असलेले ट्रक्स येतात. त्यांची धूळ जेवताना ताटात येते. तुम्ही आमच्या जागी राहून बघा, तुमच्या शेतीला लाल पाणी असते काही उत्पादन निघत नसते तुम्हाला आत्महत्या करायची वेळ आली असती. आम्हाला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. एकतर आतंकवादी व्हावे लागेल नाहीतर आत्महत्या करावी लागेल हे दोनच पर्याय आमच्या पुढे शिल्लक आहेत ह्या गोष्टीचा विचार करावा हि विनंती.शेतक-यांचे प्रश्न सोडविल्याशिवाय विस्तारीकरणास परवानगी देऊ नये.

**<u>१९) श्री. सुनील रंगनाथ काजळे, राहणार-कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

आम्ही कंपनीचे प्रकल्पग्रस्त आहोत. कंपनीचे सांडपाणी २०० फुटांपर्यंत गेले आहे. ते अजूनही स्वच्छ होत नाही. आम्हांला स्वच्छ पाण्यासाठी दुसरा कुठलाही स्त्रोत नाही. आम्ही २०-२५ प्रकल्पग्रस्तशेतकरी आहोत. शासनाकडे, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडे वेळोवेळी तक्रारी केल्या. मे महिन्यात आमची येथील पाहणी करुन गेले. अजूनही त्याचा अंतरिमअहवाल आम्हांला भेटलेला नाही. मी द्राक्ष बागायतदार शेतकरी आहे, माझी ५०० मीटरवरती जमीन आहे तेथे विहीर खोदली आहे तिला लाल पाणी लागले आहे. मला द्राक्षबाग लावायची आहे परंतु फळबाग येत नाही, लालपाण्यामुळे कोणते पीक घ्यावे हा प्रश्न पडलेला आहे आम्हाला शेतीचे पाणी स्वच्छ करून द्यावे. प्रकल्पाविषयी आमचे काही घेणे

देणे नाही तरी कंपनीने आमचे पाणी स्वच्छ करुन द्यावे. आमचे पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी स्वच्छ करुन द्यावे , एवढेच महाराष्ट्र प्रदूषण मंडळाला सांगणे आहे.

**<u>२०) श्री. श्रीकांत नरेंद्र टेकेरा. वारी.</u>**

मी कारखान्याच्या बांधावर राहणारा तरुण आहे. माझ्या विहिरीला घाण पाणी लागले आहे. प्रकल्पातील दुषित पाणी माझ्या विहिरीला उतरले आहे. मला कारखान्यात नोकरी पाहिजे हा काहीही विषय नाही. माझी पोटापाण्यापुरती शेती आहे. ती मी व्यवस्थित डेव्हलप करू शकतो आणि कारखान्याचा दोन इंजिनिअर इतके उत्पन्न मिळऊ शकतो व चार लोकांना रोजगार देऊ शकतो अशी माझी आर्थिक परिस्थिती होऊ शकते.पण माझ्या विहिरीचे पाणी कंपनीनेखराब केले, विहिरीचे पाणी चांगले असताना कंपनीने टँकरने गावाला पाणी पुरवले पण त्याचे बील अजूनपर्यंतदिलेले नाही. राष्ट्रीय हरित लवादाने जे सांगितले ते गावाला सांगितले काय?हरित लवादाने सांगितले की २कि.मी. सर्व पाणी कंपनीने खराब केलेले आहे. ह्या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती गावाला समजावून सांगावी. माझ्या शेतामध्ये माझी इच्छा होती कि डीहायड्रेशन प्लांट लावावा पण त्या प्लांट मध्ये बटाट्याचे चिप्स बनवायचे कि केळ्याचे चिप्स बनवायचे हे मला माहित नाही त्याचप्रमाणे कंपनी येथे कोणता प्लांट लावणार आहे त्यामध्ये काय करणार आहे, काय बनवणार आहे त्याची सविस्तर माहिती द्यावी.तरी आमचे प्रश्न सोडवावेत. जोपर्यंत आमचे प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत आमचा विरोध राहिल.

**२१) ज्ञानेश्वर अंबादास भाकरे<u>राहणार-कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-</u>**

माझी कारखान्याशेजारी नऊ एकर जमीन आहे त्यामध्ये मी बोअरवेल घेतला त्याला लाल पाणी लागले आहे. शेततळे बनविले त्यामध्ये देखील लाल पाणी आले आहे, ते पाणी कंपनीने इंजिन लावून उपसले त्यानंतर त्या मध्ये मी प्लास्टिक पेपर टाकला नदीवरून सायपन करून तळ्यात पाणी भरले. आज रोजी तळ्याच्या चारी बाजूने प्रदूषित पाणी (लाल पाणी) आहे. माझ्या शेतातील

मक्याचे दीड एकर उभे पीक जळून गेले आहे मी काय करायचे? मी कंपनीला वेळोवेळी तक्रार केली, अर्ज केले तरी त्यावर कंपनीने काहीही कार्यवाही केलेली नाही. माझे म्हणणे आहे कि प्रदूषित पाण्याच्या जागी चांगले पाणी कंपनीने करून द्यावे. ह्या विस्तारीकरणास माझा १००% विरोध आहे.

**२२) श्री. भगवान राजधर महाले रा. साकरवाडी:–**

प्रकल्प विस्तारीकरणास माझा पूर्ण पाठिंबा आहे. प्रकल्प विस्तारिकरणामुळे रोजगाराच्या संधि उपलब्ध होतील. तरी प्रकल्पासआमचा जाहिर पाठिंबा आहे.

**२३) श्री. अशोक गबाजी काजळे, राहणार-कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

माझी शेती प्रकल्प स्थानापासून शून्य मीटर अंतरावर आहे. म्हणजे माझा व कंपनीचा बांधएकच आहे. मी शेतात विहिर खोदली. १९९० साली विहिर खोदली. तेव्हा विहिरीत लाल पाणी आले. तेव्हापासून मी झगडत आहे. संपूर्ण जमिन नापीक झालेली आहे. हे महात्मा कृषी विद्यापीठानेही मान्य केलेले आहे. पाण्याच्या तपासण्या झाल्या त्यांनीही मान्य केले. कोर्टाने मान्य केले, पाणी प्रदूषणासाठी आम्ही राष्ट्रीय हरित लवादा कडे गेलो आहोत त्या प्रकरणातील मी एक तक्रारदार आहे.राष्ट्रीय हरित लवादानेही स्वतःची एनव्हरॉन्मेंट टीम पाठवूनमान्य केलेले आहे कि दोन कि.मी. परिसर खराब ठरवलेला आहे अश्या परिस्थितीत जमिन, पाणी खराब झाले आहे, त्यामुळे जगण्याचे साधन नष्ट झालेले आहे. मोदी सरकारने गहू तांदूळ पुरविल्यामुळे आम्ही जगलो नाहीतर जगण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला असता.या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे पूर्ण पीक नष्ट झालेले आहे. आमचे बाळ बच्चे कसे जगतील हा मोठा प्रश्न निर्माण आहे. त्या जमिनी मध्ये काही येतंच नाही इतके मोठे प्रदूषण झाले आहे. ह्या कंपनीने रेमिडिएशन च्या नावाखाली, यामध्ये माझी विहीर देखील आहे, प्रचंड मोठे तळे खोदले आहे. किती खोल तळे खोदायचे याचे काहीतरी नियम असतील याची आम्ही मागणी करत आहे. ह्या पाण्यासाठी कंपनी काही रेमिडिएशन करत नाही फक्त पाईपलाईन पसरवून ठेवली आहे. प्रदूषणमंडळाकडे यांचा फोन जातो, प्रदूषण मंडळ म्हणते कि हो आम्ही उद्या येणारे आहोत त्यानंतर कंपनी विहिरीमध्ये गोड़ पाणी भरून

ठेवते, त्या पाण्याचे चेकिंग करतात आणि निकाल देतात कि अशोक काजळे यांची विहीर छान (दुरुस्त) झाली.

अध्यक्षमहोदय आत्ता त्या विहिरीची तपासणी करू शकता. मी सत्य बोलत आहे. साठविलेल्या पाण्यामुळे माझ्या शेतातील जनावरांसाठी लावलेले पीक उफळून गेले आहे, काहीही राहिलेले नाही त्यामध्ये पाणी डबडब करत आहे अश्या प्रकारे हे लोक त्रास देतात. प्रदूषण मंडळाने लेखी दिलेले आहे कि कारखाना शेतकऱ्यांना त्रास देतो असे कबूल केले आहे असे असताना वाढीव प्रकल्पाला मान्यता दिल्यास तो आमच्या शेजारी होणार आहे, आहे हे प्रदूषण कंपनीला कमी करता येत नाही. तीन वर्षासाठी कंपनीने राष्ट्रीय हरित लवादाकडून बायोरेमेडिएशन साठी मुदत मागितली होती. ३१ डिसेंबर २०२० ला चार वर्ष पूर्ण होतील तरी काहीही फरक पडलेला नाही. १९९० मध्ये जी परिस्थिती होती ती तशीच आहे. अश्या अवस्थेमध्ये वाढीव प्रकल्पाला मंजुरी देणार असाल तर प्रदूषण वाढेल कि कमी होईल याचा विचार तुम्ही करायला पाहिजे. तरी सर्व गोष्टींचा सारासार विचार करा, आमच्या उपजीविकेचे साधन नष्ट झालेले आहे, आमच्या उपजीविकेसाठी आमच्या शेतातून उत्पन्न कसे मिळेल, विहिरीचे पाणी गोड़ कसे होईल याचा विचार करावा. कंपनीने आमच्या विहिरीचे पाणी स्वच्छ करून द्यावे, आमची काहीही तक्रार नाही. आम्ही कष्ट करून जगू शकतो. पाणी स्वच्छ करून दिल्यानंतरच ह्या विस्तारीकरणाला मंजुरी दयावी. विस्तारीकरणाला सक्त विरोध आहे.

**२४) श्री. गोरखनाथ कोंडीराम टेके, राहणार-वारी गाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

विस्तारिकरण झाल्यास नविन रोजगारांची संधी मिळेल. तरी विस्तारिकरणास परवानगी द्यावी.

**२५) श्री. विवेक अशोकराव टेके, ग्रामपंचायत सदस्य, वारी, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

या विस्तारिकरणास माझा विरोध आहे. त्याची ठळक कारणे - वायू व पाणी प्रदूषण, जीव मुठीत घेऊन पळायला लावणारे भूतकाळात झालेले दोन स्फोट,

सामजिक व आर्थिक विकास झाला असता तर मागील दोन वर्षात गावाची लोकसंख्या १२,००० वरुन ७,००० वर आली नसती. तरी विस्तारिकरणास परवानगी देऊ नये. माझा विरोध आहे.

**२६) श्री. बद्रीनाथ बाळासाहेबजाधव, माजी सरपंच, वारीगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

कंपनीने जमिन, पाणी आरोग्य दखल घेतली पाहिजे. वारी गावातील ८०% मुलांना नोक-या दिल्या पाहिजेत. परिसरात झाडे लावावीत. वैद्यकीय शिबिरे ही वर्षातून दोन वेळी भरवावीत. श्री. रामेश्वर विद्यालयाला संगणक पुरवावा व तेथील मुलांची फी भरावी. श्री. रामेश्वरविद्यालय वारी, शाळेची इमारत दुरुस्त करावी आय सी यू बेडचे एक हॉस्पीटल बांधण्यात यावे. स्थानिक लोकांना रोजगार मिळावा. २०१६-२०१७ प्रमाणे वृक्षारोपणासाठी झाडे द्यावीत. रस्त्याची दुरुस्ती करावी वर्षातून दोनदा आरोग्य शिबीर घ्यावीत. रोजगार वाढणार आहे त्यामुळे बाजारपेठ फुलणार आहे त्यामुळे आमचा विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

**२७) श्री. अनिल आप्पासाहेब गोरे, वारी गाव ग्रामपंचायत सदस्य,तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

कंपनीने जे आश्वासन दिलेले आहे. ते पाळावे. मागण्या मान्य —कराव्यात. विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

२८) श्री. दिलिप **काकळे रा. साकरवाडी**, माजी **ग्रामपंचायतसदस्य,** वारी गाव, **तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

माझा विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबाआहे. या प्रकल्पामुळे युवकांना काम मिळेल.

२९) श्री. विजय कचरू गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य, वारी गाव,**तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

वारीगावच्या मागण्यांचा विचार करावा, विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

३०) श्री. अप्पासाहेब जग्गनाथ वाणी:-

सर्व समावेशक मार्ग काढून, स्थानिकांना नोकरी द्यावी माझा विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबाआहे.वारी, गावाचा आर्थिक, भौगोलिक, सामाजिक विकास होण्या करता उद्योगाची भरभराट होणे क्रमप्राप्त आहे

३१) श्री संतोष **कारभारी उशीर,** वारीगाव,

यांनी विस्तारिकरणास पाठिंबा दिला. त्यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सूचनांचे प्रकल्प प्रवर्तकांनी पालन करावे,

**३२) योगेश रमेश बोजगेरा. धोत्रे:-**

तरुणांना रोजगार मिळत असेल तरप्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबाआहे.

**३३) श्री. दीपक प्रकाश चौधरी, कान्हेगाव, तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

कंपनी २० वर्षांपासून आमच्या गावाला टँकरने पाणी पुरवठा करते.सर्वांना पाणी मिळेल अशी पाणीपुरवठा योजना तयार करावी. आता प्रकल्प २० लाख रुपये पाण्यासाठी खर्च करते. गोरगरिबांना कंपनी कायम मदत करते.प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा आहे.

**३४) श्री. राजू** जाधव,वारी गाव-

माझा प्रकल्प विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबा आहे.

३५) श्री. शिरिष **केशवराव** कुलकर्णी, माजी **ग्रामपंचायतसदस्य,** वारी गाव, **तालुका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगरः-**

शासन उद्योजकांना बोलावते येथे न बोलावता उदयोग येत आहे,माझा प्रकल्प विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबा आहे.

३६) श्री. संजय बाळकृष्ण भडांगे **रा.<u>कान्हेगाव, तालुका-कोपरगाव,जिल्हा-अहमदनगरः-</u>**

यांनी विस्तारिकरणास पाठिंबा दर्शविला. त्यांनी सांगितले की मतभेद बाजूला करून समर्थन करावे. भारतामध्ये नोकऱ्या संपुष्ठात येत चालेल्या आहेत. ज्यांच्या काही समस्या असतील तर त्या सोडवाव्यात. तर आपण सर्वांनी प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा द्यावा कारण या मध्ये गोरगरीब मुलांना रोजगार मिळेल

**३७) श्री.अजित विंचू रा. कान्हेगाव :-**

स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्यामुळे माझा या प्रकल्प विस्तारीकरणास जाहीर पाठिंबा आहे.

३८) श्री. श्याम निवृत्ती जाधव **रा.**वारीगाव.-

माझा प्रकल्प विस्तारीकरणासपूर्णपणे पाठिंबा आहे.

**३९) कृष्णा लक्ष्मण खवले रा. वारी:-**

कंपनीने स्थानिकांच्या रोजगाराचा विचार करावा. प्रकल्प विस्तारीकरणास आमचा पाठिंबा आहे.

**४०)योगेश केरू मोकळ रा. वारी:-**

रेन वॉटर हार्व्हेस्टींग कंपनीने काय उपाययोजना केलेल्या आहेत त्या सांगाव्यात, प्रकल्प विस्तारीकरणास आमचा जाहीर पाठिंबा आहे. कंपनीने साकरवाडीसाठी आजून नवनवीन प्रकल्प आणावेत.

**४१) योगेश केकाणे :-**

प्रकल्प विस्तारीकरणास पूर्ण पाठिंबा आहे. कंपनीने वेळोवेळी वृक्षारोपण केलेले आहे. सांडपाण्यासाठी अद्यावत ईटीपी आणि एसटीपी बसविलेला आहे त्यात काही सूचना असतील तर त्या सांगाव्यात.

**४२) प्रमोद साईनाथ चव्हाण रा. धोत्रे :-**

कंपनी विस्तारीकरणास आमचा पाठिंबा आहे. कंपनी जे आजूबाजूच्या परिसरात वृक्षारोपण करते ते दरवर्षी करत राहावे हि विनंती.

**४३) दीपक भाकरे रा. कान्हेगाव, ग्रामपंचायत सदस्य :-**

कंपनीने लेखी स्वरूपात ग्रामपंच्यातला माहिती द्यायला पाहिजे होती ती दिलेली नाही. ह्या विस्तारीकरणास माझा पाठिंबा आहे. ३ ते ४ किलोमीटर परिसरातील रस्ते दुरुस्ती कंपनीने करावी.

**४४) शंकर भिवजी त्रिभूवन, रा.साकरवाडी:-**

सेवानिवृत्त कामगार, या प्रकल्पाला पूर्ण पाठिंबा आहे.

**४५) संजय नामदेव दांडगे रा.साकरवाडी:-**

या प्रकल्पाला माझा पूर्ण पाठिंबा आहे.

**४६) संदीप दिलीप काकळे रा. साकरवाडी:-**

आमची ह्या कंपनीमध्ये तिसरी पिढी असून, कंपनीने जास्तीत जास्त नवीन प्रकल्प आणावेत जेणेकरून पुढील येणाऱ्या पिढ्यांसाठी रोजगार उपलब्ध होईल. ह्या प्रोजेक्टला पूर्णपणे जाहीर पाठिंबा आहे.

**४७) संजय आनंदराव टेके रा. वारी:-**

कारखाना वाढला पाहिजे, रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला पाहिजे, त्यासाठी प्रकल्प विस्तारीकरणास कामगार, गावकरी यांचा पूर्ण पाठिंबा आहे.

**४८) बापूसाहेब रामभाऊ निळे रा. वारी:-**

आमच्या ग्रामीण भागामध्ये ह्या कारखान्यांव्यतिरिक्त रोजगारासाठी कोणताही पर्याय उपलब्ध नाही त्यामुळे प्रकल्प विस्तारीकरणास जाहीर पाठिंबा आहे.

**४९) किरण शंकर त्रिभूवन, रा. साकरवाडी:-**

कारखान्याचा कर्मचारी असून प्रकल्प विस्तारीकरणास माझा पूर्ण पाठिंबा आहे.

**५०)गोरख विंचू रा. कान्हेगाव :-**

ह्या प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा आहे.

**५१) अखिलेश रमेश राजपूत रा. वारी:-**

कंपनीने अद्यावत ईटीपी, एसटीपी आणि मल्टि इफेक्ट ईव्हापोरेशन प्लांट बसविलेला आहे तसेच कंपनीने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून बायोडाइव्हर्सिटी तयार करत आहे त्याविषयी कंपनीने गावकऱ्यांना माहिती दिली पाहिजे. ह्या प्रकल्प विस्तारीकरणास माझा पाठिंबा आहे.

**५२) नितीन प्रकाशराव करडे रा. कान्हेगाव:-**

ह्या प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा आहे.

**५३) श्री. संदीप शरदराव संत रा. वारी:-**

ह्या प्रकल्पाला पूर्णपणे पाठिंबा आहे.

**५४) श्री. संदीप सुरेश जाधव रा. वारी:-**

कंपनीने कोपरगाव येथील इंग्लिश मेडियम सारखी शाळा आमच्या वारी गावामध्ये काढावी म्हणजे आमची मुले देखील इंग्रजी वाचू शकतील. ह्या प्रकल्प विस्तारीकरणास पाठिंबा आहे परंतु कंपनीने शाळा आणि रस्ते दुरुस्ती (चांगले) केली पाहिजे.

**५५) श्री. विठ्ठल बाळासाहेब जाधव रा. वारी :-**

मी वारी येथील शेतकरी असून माझा ह्या प्रकल्पाला पूर्णपणे पाठिंबा आहे.

**५६) श्री. गणेश सुरेश जाधव रा. वारी :-**

प्रकल्प विस्तारीकरणास पूर्णपणे पाठिंबा आहे.

**५७) श्री. राकेश वरघुडे रा. सवंत्सर :-**

ह्या नवीन प्रकल्पासाठी आणि विस्तारीकरणासाठी पूर्णपणे पाठिंबा आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून बैठकीत व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्या अंतिम पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येतील.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना अजुन कोणाचे आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद आला नाही.

माननीय अध्यक्षांनी संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपल्याचे जाहिर केले.

**(संजीव रेदासनी)**
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
अहमदनगर,

**(अमर दुर्गुले)**,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,नाशिक

**(संदीप निचित),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर